**वादी क्र. १ चा उर्वरित उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते १३ तर्फे वकील श्री. के.आर.पराडकर यांचे मार्फत शपथेवर सुरु–**

**१२.** दाव्यासोबत मी जो नकाशा जोडलेला आहे तो ज्याने तयार केला आहे त्याला मी साक्षीदार म्हणून तपासणार आहे. (साक्षीदाराला दाव्यासोबत असलेला हस्त नकाशा दाखविण्यात आला.) सदरचा हस्तनकाशा हा माझे विधीज्ञ श्रीमती एस.व्ही.हरमलकर यांनी तयार केला आहे. साक्षीदार पुन्हा विचारल्यावरुन सांगतो की माझे विधीज्ञ श्रीमती एस.व्ही.हरमलकर यांना साक्षीदार म्हणून मी तपासणार नाही. हे म्हणणे खरे आहे की मला सर्वे क्रमांक १००, १०५, १०३ बाबत बऱ्यापैकी माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकत क्र. ३ म्हणजेच सर्वे नं. १०५/६ मध्ये माझ्या कुटुंबाचे पुर्वी घर होते. हे म्हणणे खरे आहे की त्या घराचा क्रमांक ३३८ असा होता. हे म्हणणे खरे आहे की पुर्वी मला शेतीची आवड होती. हे म्हणणे खरे आहे की माझ्याकडे शेतीला पुरक गाय, बैल अशी जनावरे होती. हे म्हणणे खरे आहे की हल्ली काही वर्षापुर्वी मी नवीन घर बांधले असून त्याचा घर क्र. ८३८ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे सख्खे भाऊ मधुसुदन गवाणकर यांनी देखील घर बांधले असून त्याचा घर क्र. ८२६ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की मी माझे घर सर्वे नं. १२१, हिस्सा नं. २६ मध्ये बांधले असून माझ्या भावाने सर्वे नं. १ हिस्सा नं. १० मध्ये घर बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की मी जे नवीन घर बांधले आहे ते रस्त्याला लागून आहे. हे म्हणणे खरे आहे की सर्वे क्र. १२१ हा सर्वे नं. १००, १०५ व १०३ पासून खूप अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या जुन्या घरामध्ये भाग पडलेले असून माझ्या हिश्श्याचा घराचा भाग हा जमीनदोस्त झाला. हे म्हणणे खरे आहे की प्रस्तुत दावा दाखल करण्यापुर्वी मी व माझा भाऊ मधुसुदन आम्ही दोघे आपापल्या नवीन घरात राहायला गेलो व आजपर्यंत राहत आहे.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की सर्व प्रतिवादी हे भोगवे चिंदरवाडी येथील राहणारे असून तेथे त्यांची राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की प्रत्येक प्रतिवादीच्या घरात चार ते पाच माणसे असून त्यापैकी काही माणसे वयस्कर आहेत, काही लहान मुले आहेत.

**(प्रतिवादी क्र. १ ते १३ तर्फे वकील श्री. के.आर.पराडकर यांच्या तोंडी विनंतीवरुन वादी**

**क्र.१ याचा उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**)

**श्रवणोत्तर स्विकृत,**

सही/-
(के.के.पाटील)
दिनांक- ०४/०४/२०२४ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.